200605051338097001

प्रसूती रजेच्या विद्यमान तरतुदींमध्ये सुधारणा आणि मूल दत्तक घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना देय व अनुज्ञेय रजा

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : एसएसएन-१६०२/ (६७/०२) माशि-२
मंत्रालय, मुंबई -४०००३२,
दिनांक : २५ ऑक्टोबर,२००५

वाचा :१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अरजा-१४९०/१२/सेवा-९, दि.२८ जुलै, १९९५
२) शासन शुद्धीपत्र, वित्त विभाग, क्र.अरजा-१४९०/१२/सेवा-९ दि. ४ नोव्हेंबर, १९९५
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अरजा -२४९५/२६/सेवा-९, दि. २६ ऑक्टोबर, १९९८

शासन निर्णय :-

कुटुंब लहान व मर्यादित ठेवण्याच्या उपाययोजनेसाठी केंद्र शासनाने केंद्रीय नागरी सेवा (रजा) नियम, १९७२ मधील प्रसूती रजेच्या विद्यमान तरतुदीमध्ये सुधारणा केलेल्या आहेत. लोकसंख्या नियंत्रण व कुटूंब कल्याण कार्यक्रम राबविण्याचे राज्य शासनाचेही धोरण आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडील प्रसूती रजेच्या सुधारित तरतुदी राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांनाही उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये लागू करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम १६ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीनतेने मान्यताप्राप्त शाळांमधील महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजा मंजूर करण्यात येते. राज्य शासनाने लागू केलेल्या संबधित सुधारित तरतूदी राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक शाळा / माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये / सैनिकी शाळा / अध्यापक विद्यालये इत्यादीमधील मान्यताप्राप्त पदांवरील आणि ज्यांच्या नियुक्तीस संबंधित मान्यता प्राप्त महिला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) नियमावली, १९८१ मधील अन्य तरतूदी पूर्वीप्रमाणेच ठेवून या प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

१)  महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम १६ अंतर्गत उपनियम १७ पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे -

दोनपेक्षा कमी अपत्य हयात असलेल्या महिला कर्मचाऱ्यास प्रसूती रजा देय राहील.

२)  महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम १६ अंतर्गत उपनियम १७ खालील टिपेमध्ये अट क्र. १ सुधारण्यात येत आहे. तसेच अट क्र. ३ आणि ४ नव्याने अंतर्भूत करण्यात येत असून त्या पुढीलप्रमाणे आहेत -

अट क्र. १ :- 'गर्भपात, गर्भस्त्राव आणि गर्भसमापन अधिनियम, १९७१ अन्वये घडवून आणलेला गर्भपात, यांच्याबाबतीत महिला कर्मचाऱ्यास तिच्या संपूर्ण सेवेच्या कालावधीमध्ये (किती मुले हयात आहेत हे विचारात न घेता) कमाल ४५ दिवस इतकी प्रसूती रजा अनुज्ञेय राहील.

अट क्र.३ :- 'गर्भपात, गर्भस्त्राव आणि गर्भसमापन कारणास्तव महिला शिक्षक वा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यास विश्रांतीसाठी अधिक कालावधीची आवश्यकता असेल तर देय व अनुज्ञेय रजा मंजूर करुन अनुपस्थितीचा कालावधी नियमित करता येईल. मात्र, या कालावधीबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.'

अट क्र. ४ 'हे आदेश अंमलात आल्यानंतर गर्भपात इ. कारणास्तव प्रसूती मंजूर करतांना पूर्वी उपभोगण्यात आलेली अशाच प्रकारची प्रसूती रजा विचारात घेण्यात येऊ नये.

३.  महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम १६ अंतर्गत उपनियम ३५- अ आणि ३५-ब नव्याने अंतर्भत करण्यात येत असून पुढीलप्रमाणे आहेत.

३५ - अ)  केंद्र शासनाने अलीकडेच, लहान मूल दत्तक घेणाऱ्या मातेला नैसर्गिक मातेप्रमाणेच दत्तक मुलांचे संगोपन करावे लागते आणि सुरुवातीच्या काही कालावधीत दत्तक मुलाला नवीन वातावरणाची सवय व्हावी म्हणून मूलाच्या सोबतही रहावे लागते. या सर्व बाबी विचारात घेऊन लहान मूल दत्तक घेणाऱ्या केंद्र शासकीय महिला कर्मचाऱ्यांना एक वर्षाच्या मर्यादेपर्यंत देय व अनुज्ञेय रजा मंजूर करण्यासंबंधीचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याच धर्तीवर मूल दत्तक घेतलेल्या राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांनाही एक वर्षापर्यंत किंवा मुलाचे वय एक वर्ष पूर्ण होईल तो दिनांक यापैकी जो अगोदरचा दिनांक असेल त्या दिनांकापर्यंत देय अनुज्ञेय

(वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता ६० दिवसापर्यंत परिवर्तित रजा व अर्जित रजा धरुन ) घेण्यास परवानगी देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. मात्र मूल दत्तक घेणाऱ्या दिनांकाला दोन पेक्षा कमी मुले हयात असणे आवश्यक आहे. ही तदतूद प्राथमिक शाळा / माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये / सैनिकी शाळा / अध्यापक विद्यालये इत्यादी मधील मान्यताप्राप्त पदांवरील आणि ज्यांच्या नियुक्तीस संबंधित मान्यताप्राप्त महिला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यासाठी लागू करण्यात येत आहे.

३५ - ब) अनाथ मूल दत्तक घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना पुढील अटीच्या अधीन राहून विशेष रजा मंजूर करता येईल.

i) ही सवलत राज्यातील मान्यताप्राप्त शाळांतील मान्यताप्राप्त पदांवर काम करणाऱ्या व ज्यांच्या नियुक्तीस सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता दिलेली आहे. आणि ज्या कर्मचाऱ्यांची सेवा सलग दोन वर्षे झालेली आहे (शिक्षण सेविकांच्या बाबतीत एकूण पाच वर्षे ) अशा महिला कर्मचाऱ्यांना मंजूर करता येईल.

ii) दत्तक मूल हे शासनमान्य अनाथालय / संस्था यामधून घेतलेले असावे.

iii) मूल दत्तक घेण्यासंबंधातील सर्व कायदेशीर कागदपत्रे सक्षम प्राधिकाऱ्यांस सादर करणे आवश्यक आहे.

iv) दत्तक घेते समयी दत्तक मूलाचे वय तीन वर्षापेक्षा कमी असावे आणि उत्तक मूल अनाथ असावे.

v) विशेष रजा मूल दत्तक घेतलेल्या दिनांकापासून किंवा दत्तक मूलाचे वय तीन वर्षे पूर्ण होईल तो दिनांक यापैकी जो अगोदरचा दिनांक येईल त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी जास्तीत जास्त ९० दिवसांपर्यंत अनुज्ञेय राहिल.

vi) ही विशेष रजेची सवलत महिला कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण सेवेच्या कालावधीत फक्त एकदाच अनुज्ञेय राहिल.

vii) ही विशेष रजेची सवलत फक्त स्वतःचे मूल नसलेल्या महिला कर्मचाऱ्यांनाच अनुज्ञेय राहील.

टिप :- उपरोक्त मूल दत्तक घेणाऱ्या किंवा अनाथ मूल दत्तक घेणाऱ्या महिला शिक्षण सेविका कर्मचाऱ्यांना त्यांच्या शिक्षण सेवक कालावधीसाठी या दोन्हीही सवलती अनुज्ञेय नाहीत.

उपरोक्त सुधारणा महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम १६ मध्ये यथावकाश करण्यात येतील.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र. ३७६/०५/सेवा -८, दिनांक २६.८.२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.अ.साळवे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / प्रौढ)
शिक्षण निरीक्षक (दक्षिण /उत्तर /पश्चिम)
महालेखापाल -१ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
महालेखापाल -१ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षण (शिक्षण विभाग)
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग सर्व कार्यासने
निवड धारिका (माशि-२ )